# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

## महाविद्यालयीन शाखा

Email ID : info@collegesvmail.com

दिनांक ०७-११-२०१२

प्राचार्य,
सुर्योदय कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी
विहीरगाव, उमरेड रोड जि. नागपूर ४४१२०४

विषय :- सत्र २०१२-१३ पासुन नवीन विद्याशाखा / प्रवेश क्षमता वाढ / अभ्यासक्रमास प्रथम संलग्निकरण प्रदान करण्याबाबत.

संदर्भ : १) शासन पत्र क्र. टीईएम-२०१२/प.क्र. १८ /तांशि-४, दिनांक ०१ फेब्रुवारी २०१२
२) ए. आय. सी. टी. ई. चे मान्यता पत्र दिनांक १० मे २०१२

महोदय

आपणास कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भांकित पत्रानुसार राज्य शासनाने व ए.आय.सी.टी.ई.ने आपल्या महाविद्यालयास सत्र २०१२-१३ पासुन नवीन विद्याशाखा / प्रवेश क्षमता वाढ / अभ्यासक्रमास सुरु करण्यास दिलेल्या परवानगीनुसार व स्थानिय चौकशी समितीने केलेल्या शिफारशीनुसार मा.कुलगुरुंनी विद्वत परिषदेच्या वतीने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम १४(७) अंतर्गत नवीन विद्याशाखा / प्रवेश क्षमता वाढ / अभ्यासक्रमास सत्र २०१२-१३ पासून प्रथम संलग्निकरण खालील अटींच्या अधिन राहून प्रदान करण्यास मान्यता प्रदान केली आहे

| महाविद्यालयाचे नांव | विद्याशाखा / प्रवेश क्षमता वाढ / अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता व माध्यम |
|---|---|---|
| सुर्योदय कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी विहीरगाव उमरेड रोड जि. नागपूर ४४१२०४ | १) बी.ई. मेकॅनिकल इंजिनिअरिंग Regular - Shift | १) प्रवेश क्षमता वाढ (६० वरुन १२०) |

### प्रथम संलग्निकरण खालील अटींच्या अधिन प्रदान करण्यात येत आहे

१. उपरोक्त नवीन विद्याशाखा / प्रवेश क्षमता वाढ / अभ्यासक्रमास देण्यात आलेले प्रथम संलग्निकरण विद्यापीठाद्वारे गठीत स्थानिय चौकशी समितीने महाविद्यालयास भेट देऊन सादर केलेल्या अहवालात दर्शविलेल्या त्रृटी विहीत कालावधीत पूर्ण करण्याच्या अटीवर देण्यात येत आहे. (समितीच्या अहवालाची प्रत सोबत जोडलेली आहे.)

२. संदर्भांकित शासन परवानगीमध्ये नमुद केलेले संपूर्ण अटींचे पालन संस्थेने / महाविद्यालयाने विहीत कालावधीमध्ये पूर्ण करण्याच्या अटीवर संलग्निकरण देण्यात येत आहे.

३. विद्यापीठाने विहीत केलेल्या निकषानुसार व विद्यापीठ अनुदान आयोगाने विहीत केलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसार महाविद्यालयाने अध्यापक वर्ग / कर्मचारी वर्ग नेमणे आवश्यक असुन इतर सर्व आवश्यक पायाभुत सोयी उपलब्ध करुन त्याची खात्री विभागीय सहसंचालकांनी करुन विद्यापीठास तसे प्रमाणपत्र देण्याच्या अधिन मान्यता देण्यात येत आहे

४. नवीन विद्याशाखा मंजुर करण्यात आलेल्या महाविद्यालयांनी ज्याची स्थापना होऊन ५ वर्ष झाली आहेत त्यांनी एक वर्षात व ज्यांची ५ वर्ष झालेली नाहीत त्याची ५ वर्ष पुर्ण होताच एक वर्षात NAAC ॲक्रेडिएशन प्राप्त करुन घ्यावे व ते या कालावधीत न मिळाल्यास सदर विद्याशाखा मान्यता आपोआप रद्द होईल या अटीवर मान्यता देण्यात येत आहे

५. उपरोक्त अभ्यासक्रमाची परवानगी प्राचार्य व नियमित शिक्षक भरण्याच्या अटीवर देण्यात येत आहे. प्राचार्य व नियमित शिक्षकांची नियुक्ती न केल्यास विद्यार्थ्यांना दिलले प्रवेश रद्द होतील

६. उपरोक्त नवीन विद्याशाखा / प्रवेश क्षमता वाढ / अभ्यासक्रमास कायम विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास आपले महाविद्यालय तयार असुन त्या आशयाचे हमीपत्र महाविद्यालयाने विभागिय सहसंचालक (उच्च शिक्षण) नागपूर यांना सादर करण्याच्या अटीवर ही मान्यता देण्यात येत आहे

७. प्रथम संलग्निकरण प्राप्त झाल्यानंतर ज्या महाविद्यालयांनी वरील नमुद विविध अटी व शर्तीची पुर्तता केली नाही अशा महाविद्यालयाला पुढील वर्षाकरीता निरंतर संलग्निकरण देता येणार नाही व जर अशा महाविद्यालयांनी पुढील सत्रासाठी प्रवेश प्रक्रिया केली तर प्रवेशित विद्यार्थ्यांची परीक्षा विद्यापीठ घेणार नाही व त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची राहील

८. ज्या अभ्यासक्रमाचे अभ्यासक्रमीका, अध्यादेश विद्यापीठाने तयार नाही असे अभ्यासक्रम / विषय महाविद्यालयांनी सुरु करु नये

९. कायम विना अनुदान तत्वावर महाविद्यालयास अभ्यासक्रम आर्थिकदृष्ट्या चालविणे शक्य व्हावे याराठी संस्थेने महाविद्यालयाने विद्यार्थ्यांकडुन विद्यापीठ / शिक्षण शुल्क समितीने ठरविलेल्या शुल्कानुसारच शुल्क आकारावे

१० महाविद्यालयाच्या बांधकामाचे मोजमाप करण्याकरीता अभियंता समिती महाविद्यालयाला भेट देऊन सादर करणाऱ्या अहवालातील अटींच्या अधिन मान्यता देण्यात येत आहे

११ वरील सर्व अटींची पुर्तता तसेच पुढील निरंतर संलग्निकरणाकरीता अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद / राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद / बार कौन्सिल ऑफ इंडिया इत्यादी शिखर संस्थांनी घालुन दिलेल्या अटींची पुर्तता विहीत कालावधीत संस्थेने न केल्यास पुढील संलग्निकरण स्थगित होईल व त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची / संस्थेची राहील याची नोंद घ्यावी

१२ महाविद्यालयातील सदर नवीन विद्याशाखा / प्रवेश क्षमता वाढ अभ्यासक्रम पुढील वर्षासाठी निरंतर संलग्नीकरणाकरीता शुल्कासह आवेदनपत्र दि. ३१ ऑगस्ट पूर्वी www.onlinebcudrtmnu.org या संकेतस्थळावर ऑनलाईन सादर करणे बंधनकारक राहील.

कृपया कळावे

आपला विश्वासू,

(संजय चिमलवार)
उपकुलसचिव (म.वि.)
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

प्रतिलिपी माहितीकरिता सादर :-

१ मा. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई - ३ महापालीका मार्ग, मुंबई-४००००१
२ सहसंचालक, (तंत्र शिक्षण), सदर, नागपूर
३ मा. संचालक (म.वि.वि.म.)
४ मा. वित्त व लेखा अधिकारी.
५ मा. परिक्षा नियंत्रक
६. उपकुलसचिव विद्या विभाग
७ सहायक कुलसचिव, परीक्षा विभाग, गोपनिय विभाग, व्यावसायिक परीक्षा, परीक्षा व चौकशी.
८ संबंधित लिपीक, शिक्षक मान्यता.
९ संबंधित लिपीक, संलग्निकरण शाखा.
यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी आपल्या स्तरावर आवश्यक ती कार्यवाही करावी.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

(डॉ. रमण मदने)
सहायक कुलसचिव (म.वि.)
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ